RATAN TATA
MAHARASHTRA STATE
SKILLS UNIVERSITY

## शोध-सह-निवड समितीमार्फत अर्ज मागविण्यात येत आहेत
## रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी

माननीय कुलपती यांनी गठित केलेली शोध-सह-निवड समिती, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अधिनियम, 2021 च्या कलम 12(3)(फ) (महाराष्ट्र अधिनियम क्रमांक तेहतीस, 2024 सह वाचता, व सद्यस्थितीत यथासुधारित) अन्वये, महाराष्ट्रातील शासनाने स्थापन केलेल्या पहिल्या कौशल्य विद्यापीठ असलेल्या रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या (आरटी-एमएसएसयू) कुलगुरू पदासाठी विहित केलेली अर्हता व अनुभव पूर्ण करणाऱ्या प्रतिष्ठित शिक्षणतज्ज्ञांकडून अर्ज/नामांकने मागवीत आहे.

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ (RT-MSSU) हे महाराष्ट्रातील पहिले शासन-स्थापित कौशल्य विद्यापीठ असून, कौशल्य-केंद्रित दृष्टिकोनातून उच्च शिक्षणाची नवी दिशा निश्चित करत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) शी सुसंगत असलेल्या RT-MSSU मध्ये शैक्षणिक ज्ञानासोबत प्रत्यक्ष कौशल्य प्रशिक्षणावर भर दिला जातो. विद्यार्थ्यांना उद्योगातील प्रत्यक्ष प्रशिक्षण (OJT), कार्यक्षमतेवर आधारित मूल्यमापन आणि मजबूत उद्योग भागीदारी यांच्या माध्यमातून उद्योगसज्ज व रोजगारक्षम पदवीधर बनविण्याचे विद्यापीठाचे उद्दिष्ट आहे. विद्यार्थ्यांसाठी लवचिक प्रवेश व निर्गमन पर्याय उपलब्ध असून, त्यानुसार प्रमाणपत्र, पदविका किंवा पदवी प्राप्त करण्याची संधी मिळते. कारण RT-MSSU मध्ये -- "कौशल्य हीच शक्ती आहे!" रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाची स्थापना महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अधिनियम, 2021 (महाराष्ट्र अधिनियम क्र. VII of 2021) अंतर्गत करण्यात आली. सदर अधिनियम 23 मार्च 2021 रोजी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 348(3) मधील तरतुदीनुसार प्रकाशित करण्यात आला. अधिक माहितीसाठी वेबसाईट : www.mssu.ac.in

विहित अर्हता व अनुभव पूर्ण करणाऱ्या आणि हे प्रतिष्ठित व आव्हानात्मक पद स्वीकारण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांनी विहित नमुन्यात प्रत्यक्ष प्रतींमध्ये (4 प्रती) डाकेने/कुरिअरने, लखोट्यावर “कुलगुरू पदासाठी अर्ज, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ” असे स्पष्टपणे नमूद करून, तसेच सॉफ्ट कॉपी खालील पत्त्यावरील नोडल अधिकारी यांच्याकडे **सोमवार, दिनांक १४ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी १७:०० वाजेपर्यंत** पोहोचेल अशा रीतीने पाठवावी.

नोडल अधिकारी यांचे नाव व पत्ता : प्रो अविनाश चन्द्र पाण्डेय
निदेशक
अन्तर्विश्वविद्यालय त्वरक केन्द्र
अरुणा आसफ अली मार्ग, नवी दिल्ली – 110067
संपर्क क्रमांक : +91-11-24126036
ईमेल : nodalofficer.mssuvc2026@iuac.res.in
nodalofficer.mssuvc2026@gmail.com (प्रत/CC)

सविस्तर जाहिरात, आवश्यक अर्हता व अनुभव, अर्जाचा नमुना तसेच इतर आवश्यक कागदपत्रे रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या **[https://www.mssu.ac.in]** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

**अध्यक्ष**
**शोध-सह-निवड समिती**

दिनांक : १३ ऑगस्ट, २०२६